# मध्य प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई

## !! प्रेसनोट !!

**कोविड १९ या लसीचा कच्चामाल पुरवितो असे सांगुन आर्थिक फसवणुक करणा—या आरोपीतांस सायबर गुन्हे शाखेकडुन अटक**

| | | |
|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | मध्य विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई |
| ०२ | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम | २३/२०२१ कलम ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादंवि सह कलम ६६(क), (ड) माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० (अॅमेंडमेंट—२००८), विदेशी नागरीक कायदा कलम १४, पासपोर्ट अॅक्ट कलम १२ (१) (सी), (१ए) (बी), |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०७/१०/२०२१ चे सकाळी १४:०० वा नंतर |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २७/१०/२०२१ रोजी १२.४० वाजता. |
| ०५ | गुन्ह्याचे घटनास्थळ | ४/६, विवेकानंद सोसायटी, टी.एच. कटारिया मार्ग, माहिम (पश्चिम), मुंबई |
| ०६ | गुन्ह्यात फसवणूक झालेली मालमत्ता | रोख रक्कम रु. १२,८४,०००/— |
| ०७ | हस्तगत मालमत्ता | १०मोबाईल, २ सिमकार्ड, १ पासपोर्ट, १ वहि |
| ०८ | अटक आरोपी | १) एक इसम, वय २६ वर्षे, रा.ठि. खारघर, नवी मुंबई<br>२) **एक परेदशी नागरीक वय ३४ वर्ष, (नायजेरीय नागरीक)** रा.ठि. पनवेल, नवी मुंबई |
| ०९ | तपासी अधिकारी | पोलीस उप निरीक्षक निलेश रमेश हेंबाडे.<br>पोलीस निरीक्षक राहुल खटावकर<br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गोविलकर |

कोविड — २०१९ महामारीच्या पार्श्वभुमीवर सर्वसामान्य जनतेमध्ये स्वत:चे व कुटुंबियांचे आरोग्य व जीवित याबददल प्रचंड चिंता निर्माण झालेली आहे. या अनुषंगाने कोविड लसीचा वापर करून जास्तीत जास्त लोकांचे आरोग्य स्वस्थ रहावे यासाठी अथक प्रयत्न केले जात आहेत. सध्या कोविड लसीचा तुटवडा निर्माण होत आहे. त्याचा फायदा घेउन काही ठग हे वेगवेगळया युक्त्या वापरून अनेक लोकांची फसवणुक करीत आहेत. कोविड १९ लसीचा कच्चामाल पुरविण्याच्या बहाण्याने संपर्क साधुन लोकांची फसवणुक करण्यात येत आहे. अशाच प्रकारच्या फसवणुकीचा गुन्हा सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग, मुंबई येथे दाखल असुन त्यातील तक्रारदार हे जेष्ठ नागरिक आहेत.

<u>गुन्हयाची थोडक्यात हकीकत</u> :— सदर जेष्ठ नागरीक तक्रारदार यांना फसवणुक करणा—या इसमांनी ईमेल व मोबाईल क्रमांकावरून संपर्क साधला. त्यांची लंडन येथे ''ICONIC PHARMACEUTICAL & Manufacturing'' नावाची कंपनी असुन ते कोव्हीड १९ आजाराचे व्हॅक्सीन बनविण्याचे काम करतात असे सांगितले. कंपनीसाठी लागणारा ''फायझोन डायजेस्ट'' नावाचा कच्चामाल त्यांना भारतातुन खरेदी करण्यासाठी एजंटची आवश्यकता असुन एजंटला ६०% कमीशन देण्याचे आमिष दाखविले. तक्रारदार यांनी सदर कंपनीस कच्चामाल पुरवावा यासाठी त्यांना विविध कारणे सांगुन त्यांचा विश्वास संपादन केला. आरोपीतांनी आपापसात कट रचुन संगनमताने फिर्यादी

यांना त्यांनी दिलेल्या विविध बॅक खात्यात १२,८४,०००/— रूपये भरण्यास भाग पाडुन त्यांची फसवणूक केली.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने तांत्रिक विश्लेषण करून आरोपींतांची माहिती प्राप्त केली असता सदरचे आरोपी हे नवी मुंबई येथे वास्तव्यास असल्याची माहीती प्राप्त झाली. त्यामुळे सदर ठिकाणी पोलीस पथक पाठवून पनवेल तालुका पोलीस ठाणे व खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या मदतीने २ आरोपीतांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे.

वरील आरोपीतांकडुन एकुण ९ मोबाईल फोन्स, २ सिमकार्ड, १ पासपोर्ट (बनावट नावाचा) असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तपासानंतर गुन्हयातील ०१ अटक आरोपी हा परदेशी (नायजेरियन) नागरीक असल्याने त्याचेकडे पासपोर्ट बाबत चौकशी केली असता त्याचेकडे बनावट पासपोर्ट मिळुन आला असून त्याबाबत अधिक चौकशी करीत आहोत. सदर आरोपीताविरूध्द इतर राज्यातही गुन्हे दाखल आहेत. सदर अटक नायजेरियन आरोपी व त्याचे साथीदाराने अनेक लोकांना फसविले असून त्याबाबत अधिक तपास चालु आहे.

सायबर क्राईम ब्रॅच, मुंबई कडून जनतेस आवाहन करण्यात येते की, जर कोणी आपल्याशी संपर्क साधुन कोविड १९ लसीचा कच्चामाल पुरविण्याच्या बहाण्याने जास्त रकमेचे आमिष देण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याबाबत सतर्क रहा. त्याबाबतची माहीती तात्काळ नजिकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर पोलीस ठाणेस दयावी.

सदरची प्रभावी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री.मिलिंद भारंबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त डॉ. रश्मी करंदीकर (सायबर गुन्हे मुंबई , सहायक पोलीस आयुक्त श्री. नितीन जाधव (सायबर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मध्य विभाग सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गोविलकर, पोनि राहुल खटावकर, पोउपनिरीक्षक निलेश हेंबाडे, पोशि. बावडेकर व इतर अधिकारी कर्मचारी यांनी यशस्वीपणे पार पाडली.